परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे — ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune – 411 007
Phone: (020) 2562 1398
E-mail: dyrst@pun.unipune.ac.in

संदर्भ: परीक्षा/एस ॲण्ड टी/ ९५० दिनांक : २०/०६/२०२५

## अत्यंत तातडीचे व अनिवार्यतेचे

प्रति
**मा. प्राचार्य/संचालक,**
**सर्व संलग्नित व्यवस्थापन महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**
**(पुणे जिल्हा)**

**विषय :** केंद्रीय मूल्यनिर्धारण केंद्रावरील (CAP) MCA/ MBA/MBA IT/MBA HR या अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन व नियमनातील अनुपस्थितीबाबत...

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/एस ॲण्ड टी/६९३, दिनांक २५.०४.२०२५

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, MCA/MBA/MBA IT/MBA HR या अभ्यासक्रमांसाठीच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन व नियमन पुणे जिल्ह्यासाठी — **AISSMS INSTITUTE OF MANAGEMENT, KENNEDY ROAD, NEAR RTO, PUNE - 411001** या केंद्रीय मूल्यनिर्धारण केंद्रावर मागील ४० दिवसांपासून सुरु आहे. या मूल्यनिर्धारण केंद्रांकडून विद्यापीठाकडे दिनांक २० जून, २०२५ पर्यंत जमा झालेल्या मूल्यांकन व नियमनोत्तर उत्तरपत्रिका केवळ ४० टक्के आहेत आणि ही परिस्थिती अतिशय चिंताजनक आहे. शनिवार दिनांक २१ जून, २०२५ आणि रविवार, दिनांक २२ जून, २०२५ या दोन दिवसातच MCA च्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन व नियमन पूर्ण होणे आवश्यक आहे.

आपणास परीक्षा/एसॲण्डटी/६९३, दिनांक २५ एप्रिल, २०२५ या संदर्भानुसार याहीअगोदर निर्देशित करण्यात आले होते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ४८(४) यानुसार मूल्यमापन (Examining) व नियमन (Moderation) ही कार्ये सर्वच शिक्षकांसाठी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी (केंद्रीय मूल्यनिर्धारण प्रकल्प केंद्रावरील या संदर्भातील सहायक सेवा) यांच्यावर बंधनकारक असून यात हलगर्जीपणा करणे अथवा अनुपस्थित राहणे हा गंभीर प्रमाद आहे.

आपणास या पत्राद्वारे अंतिमत: कळविण्यात येत आहे की, आपण आपल्या महाविद्यालयात मागील सत्रांत शिकवणा—या सर्व शिक्षकांना दिनांक २१ जून, २०२५ रोजी तात्काळ कार्यमुक्त करुन अथवा सुट्टीवर असल्यास त्यांना दिनांक २१ जून, २०२५ रोजी तात्काळ संबंधित केंद्रीय मूल्यनिर्धारण केंद्रांवर रुजू होण्यास निर्देशित करावे. केंद्रिय मूल्यनिर्धारण केंद्राकडून तशी पत्रे प्राप्त झाली नसतील

..२/—

तरीही त्यांनी तात्काळ या केंद्रीय मूल्यनिर्धारण केंद्रावर मूल्यांकनासाठी व नियमनासाठी रुजू व्हावे, याबाबत आपण निर्देशित करावे. याच पत्राद्वारे सर्व संबंधित शिक्षकांनाही निर्देशित करण्यात येत आहे की, आपण उद्या दिनांक २१ जून, २०२५ पासूनच संबंधित केंद्रीय मूल्यनिर्धारण केंद्रावर रुजू व्हावे.

मा.प्राचार्य/संचालक यांना निर्देशित करण्यात येत आहे की, आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील शिक्षक संबंधित केंद्रीय मूल्यनिर्धारण केंद्रावर रुजू झाल्याचा अहवाल दिनांक २१ जून, २०२५ रोजी तात्काळ संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांना **coe@unipune.ac.in** या ईमेलवर कळवावा आणि संबंधित शिक्षकांनीही आपणास याबाबत योग्य ते सहकार्य करावे असेही निर्देशित करण्यात येत आहे.

या पत्राद्वारे अंतिमत: हेही नमूद करण्यात येते आहे की, उद्यापासून परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून यासंदर्भातील प्रमादच्या सभांचे तात्काळ नियोजन करण्यात येत असून उत्तरपत्रिका मूल्यमापन व नियमनात गैरहजर वा हलगर्जीपणा करणा—या शिक्षकांना प्रमादमध्ये पाचारण करुन त्यांच्यावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ४८(५) (क) (ख) नुसार सक्त कारवाई करण्याबाबतची प्रक्रियाही सुरु करण्यात येत आहे.

याबाबत आपणास परीक्षा/एसऑण्डटी/६९३, दिनांक २५ एप्रिल, २०२५ या पत्राद्वारे विनम्र आवाहन करण्यात आले होते, तरीही आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील ज्या शिक्षकांनी केंद्रीय मूल्यनिर्धारण केंद्रावर रुजू न होता कर्तव्यात कसूर केली आहे आणि ही बाब अतिशय गंभीर प्रमादाचीच आहे. अंतिमत: याबाबत आपण सर्वच शिक्षकांमध्ये गांभीर्य निर्माण करुन त्यांना केंद्रीय मूल्यनिर्धारण केंद्रावर जाण्यास उद्युक्त करावे, असे आवाहन आपणास करत आहे.

हे पत्रक तात्काळ व अत्यंत संवेदनशील म्हणून सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.

कळावे,

आपला,

(डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी :**
**मा. संचालक, एआयएसएसएमएसचे इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, केनडी रोड, पुणे**